भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०२/२०१७

**१) अज्ञात कारची मोटार सायकलला धडक लागुन रोडवर पडल्याने समोरुन येणाऱ्या ट्रक छातीवरुन गेल्याने एकाचा मृत्यु तर दोन जखमी . :–**

दिनांक १९/०२/२०१७ चे २२.३० वा. दर. यातील फिर्यादी नितीन दामोदर बर्वे वय १९ वर्ष, रा. सौदंड ता. सडक अर्जनी जिल्हा गोंदीया हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३५ व्ही १८४५ पॅशन प्रो हिरो होंन्डा ने तीन सीट गावाकडे जात असतांना त्याचे मागेहुन येणाऱ्या यातील अज्ञात आरोपी कार तसेच ट्रक चालकाने आपआपली वाहने भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन कार चालकाने मोटार सायकलचे हॅन्डलला धडक मारुन मोटार सायकल वर बसलेले तिन्ही इसम रोडवर पडले व मागेहुन येणारे ट्रक चे चाक फिर्यादीचे वडीलाचे छाती वरुन गेल्याने वडील मृतक दामोदर बर्वे वय ६० वर्ष, हा जागीच मरण पावला व फिर्यादीची आई शेवंताबाई वय ५५ वर्ष हीच्या डोक्याला मार लागुन जखमी झाली व फिर्यादीचे कमरेला घसाटा मार लागल्याने यातील अज्ञात वाहन चालकाने पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवी. सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फुकट पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे

**२) संगनमत करुन महीलेस अश्लिल शब्दात शिविगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०२/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी ही आपले घरी संडास मध्ये जावुन परत आली असता आरोपी क्र. १ व २ यांनी रागाचे भरात तु संडास मध्ये पाणी ओतली नाही या कारणावरुन भांडण केले व मारण्यास धावल्याने फिर्यादी ही घरा समोर रोड वर जावुन उभी असतांना आरोपी क्र. १ व २ नी संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन लाखडी झिल्पीने मारुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३२३,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) ट्रॅक चालकांने ट्रॅक्टरला मागेहुन धडक मारुन ट्रॅक्टर टॉली मध्ये बसलेल्या तीन मजुरांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/०२/२०१७ चे १९.४५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी मनोज राजहंस वंजारी वय २४ वर्ष, रा. चीखलाबोडी जिल्हा नागपुर हा आपल्या ट्रॅक्टर क्र. एमएच ४० एएम ०४९२ वरचे धाणाचे बोरे खाली करुन एनएच ०६ रोडाने गावाकडे परत जात असतांनी शाहापुर जवळ यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपने चालवुन ट्रॅक्टर ला मागेहुन धडक मारुन ट्रॅक्टर वर बसलेले कनैया बन्सोड, मधु वधी, खेमु कुंभरे या मजुर लोकांना खाली पाडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व ट्रॅक्टर चे नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४,१३४ (ब) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २०/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ६५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.